अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# राज्यात राजकीय पतंगबाजीला ऊत

मकर संक्रांतीपासून पुढे जवळपास महिनाभर देशभरात विविध भागांमध्ये पतंग महोत्सवच सुरू होतो. विविध आकारांचे रंगाचे पतंग आकाशात सोडले जातात. ज्याचा पतंगाचा मांजा जितका धारदार, तितका तो दुसऱ्याची पतंग कापण्यामध्ये यशस्वी होत असतो. जमिनीवर उभे राहायचे. वाऱ्याच्या मदतीने आकाशात पतंग उडवायचे आणि एका वेगळ्याच खेळाचा आनंद उपभोगायचा. असा हा पतंगांच्या उडवाउडवीचा किंवा काटाकाटीचा मनमुराद आनंद देणारा खेळ फार परंपरेने खेळला जातो. सध्या एका वेगळ्या अर्थाने राजकीय क्षेत्रामध्येसुध्दा अशाच पतंगबाजीला जोर आला आहे. मात्र इथे निर्भेळ आनंद दिसत नाही. तर एकमेकांचा वचपा काढण्याकरता एकमेकांवर तुटून पडणाऱ्यांची संख्या जास्त दिसते. आपल्या पक्षाचा पतंग राजकीय वातावरणात टिकून राहिला पाहिजे आणि आपल्या हातामध्ये नेहमीच सत्तेचा धारदार मांजा राहिला पाहिजे. ज्याच्या जोरावर इतर पतंगांना काटशह देता आला पाहिजे. असा खेळ या राजकीय पतंगबाजीमध्ये पहायला मिळतो. अगदी राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस त्याच्या जोडीला नव्याने उतरलेली आम आदमी पार्टी तर महाराष्ट्राच्या पातळीवर विरोधी पक्षांपेक्षाही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोघांमधल्या आपापसातल्या पतंगबाजीने बरीच टोकाची स्पर्धा गाठलेली दिसून येते. तशीच काहीशी स्पर्धा शिवसेना आणि मनसेमध्ये सुरू आहे. भाजपा संभ्रमात असल्यामुळे आम आदमी पार्टीची नवी टीम आपल्या पतंगाला कुठे कुठे काट देईल, याचा अजून भारतीय जनता पार्टीला अंदाज आलेला नाही. म्हणून हा पक्ष सध्या थोडा घाबरत घाबरतच या राजकीय पतंगबाजीच्या स्पर्धेत दिसून येतो. राजकारण हे भारतीय लोकशाहीचे एक अविभाज्य अंग आहे. त्यामध्ये कसलेले राजकीय पक्ष कोणताही विधिनिषेध न पाळता डावपेच खेळत असतात. खरे तर लोकशाही म्हटल्यानंतर लहान–मोठ्या किंवा अगदी व्यक्तीगत अथवा सामाजिक संघटनेलासुध्दा निवडणुकीचे रिंगण उपलब्ध असले पाहिजे. परंतु हे पिढीजात आणि घराणे चालवणारी राजकीय पक्ष इतरांना या स्पर्धेत उतरूच देत नाहीत. अशा या दिग्गज पक्षांविरुध्द पतंगबाजी करताना नव्या खेळाडूला कशा प्रश्नांना सामोरे जावे लागते हे आम आदमी पार्टीच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसते. काही का असेना परंतु, या नव्या दमाच्या आम आदमीने भल्या भल्या राजकीय पक्षांच्या पतंगांना काट द्यायला सुरुवात केली आहे. या पक्षाच्या पतंगाचा मांजा दिवसेंदिवस अधिकाधिक धारदार होत आहे तसतसा अन्य मोठ्या पक्षांची पाचावर धारण बसत आहे.

## आपची भाजपाला धास्ती

यंदाचे वर्ष हे निवडणूक वर्षच म्हणावे लागेल. देश पातळीवर लोकसभा निवडणुकींनी सगळा देश ढवळून निघेल. तर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकाही होणार असल्यामुळे प्रचार, त्यासाठीचे आरोप–प्रत्यारोप, राजकीय डावपेच, तिकीट मिळवण्यासाठीची धडपड, पक्षांचे समझोते, एकमेकांमधली फाटाफुट यांना आणखीनच जोर येईल. त्याची सुरुवात तर आताच झालेली दिसून येते. गेल्या महिनाभरापासून राष्ट्रवादी आणि राष्ट्रीय काँग्रेस यांच्यामध्ये बेबनाव निर्माण झाल्यासारखेच चित्र आहे. प्रत्यक्ष शरद पवारांनी सहा महिन्यांपूर्वीच थेट मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टीकास्त्र सोडले. मुख्यमंत्री वेगाने निर्णय घेत नाहीत. त्यांच्याकडे ती क्षमता नाही. महत्त्वाच्या फाईलींवर सह्या करताना त्यांचा हात का कापतो? असा प्रश्न विचारून पवारांनी चव्हाणांच्या मर्मावरच बोट ठेवले. परंतु ज्या फाईलींच्या मागे हेतू चांगला नाही अशा फाईलींवर आपण सह्या करणार नाही, असे जाहीर करून चव्हाणांनी पवारांच्या फाईल कर्माविषयी प्रश्नचिन्ह उभे केले. आता शरद पवारांचेच पुतणे उर्फ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना ढुसण्या घायला सुरुवात केली आहे. जर पटापट निर्णय झाले नाहीत तर राष्ट्रवादी काँग्रेस सरकारचा पाठिंबा काढून घेईल, असा इशारा देण्यापर्यंत त्यांची मजल गेली. प्रामुख्याने पुणे महानगराशी संबंधित अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री निर्णय घेण्यात टाळाटाळ करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पवारांच्या या टीकेनंतर पृथ्वीराज चव्हाण यांनी राष्ट्रवादीची समजूत काढण्याकरिता दोन–चार फाईली इकडे–तिकडे केल्या आणि सह्या करून पाठवून दिल्या. परंतु ही टाळाटाळ नसून आपण राज्याचे मुख्यमंत्री आहोत आणि आपलाच निर्णय अंतिम राहतो, हे दाखवून देण्यात चव्हाणांना जास्त रस असतो. परंतु, येणाऱ्या लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांत हे दोन्ही पक्ष शत्रू असूनही मित्र म्हणून निवडणूक लढवणार आहेत. कारण दोघांनाही स्वत:च्या ताकदीची कल्पना आहे. म्हणूनच आपण काँग्रेसच्या तुलनेत कुठेही मागे पडू नये, असा राष्ट्रवादीचा प्रयत्न दिसून येतो. या हेतूनेच शरद पवारांनी लोकसभा निवडणुकीसाठी जवळपास दहा उमेदवारांची नावे घोषित केली आहेत. त्यात कदाचित थोडेफार बदल होतील. परंतु विजयाची निश्चिती करण्याच्या हेतूने राष्ट्रवादीची अन्य पक्षांपेक्षा जोरदार तयारी आणि मुसंडीही दिसते.

## महायुतीचा महापतंग

राज्यातल्या या सगळ्या निवडणूकपूर्व पतंगबाजीमध्ये आम आदमी पार्टीसारखा पक्ष किंवा मनसेसारखी दणका देणारी पार्टी त्यांच्या त्यांच्या नव्या टेक्नॉलॉजीसह उतरली तर या प्रस्थापित पक्षांचे धाबे दणाणल्याशिवाय राहणार नाही. प्रामुख्याने आम आदमी पार्टीचा पतंग जास्त उंच उडण्याची शक्यता आहे. त्याचा आपल्या पतंगाला धोका पोहचू नये, त्यासाठी सगळेच पक्ष प्रयत्न करतील. त्यातही भाजपाला तर आपपासून मोठाच धोका वाटू लागला आहे. अगदी हक्काच्या जागा आम आदमी पार्टीमुळे भाजपाच्या जागा सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अर्थातच मनसेने अजूनही एकट्यानेच जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे त्याचा फटका एकदाच सगळ्या पक्षांना बसू शकेल. शिवसेना, भाजपा, रिपब्लिकन पक्ष आणि आता नव्याने या महायुतीत सामिल झालेला राजू शेट्टी यांचा स्वाभिमानी पक्ष असा हा नवा महाराजकीय पतंग निवडणुकीच्या वातावरणात वेगळाच प्रभाव निर्माण करणारा ठरू शकेल. अद्याप निवडणुका जरी घोषित झालेल्या नसल्या तरी एकमेकांना शह–काटशह किंवा डावपेच जोरात सुरू झाले आहे. या राजकीय पतंगबाजीमध्ये एकमेकांच्या काटाकाटीला जोर आलेला दिसून येतो.